जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

सोमवार दि.५ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३३७
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे






Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com


# ‘श्रावण महिन्यात एसटीसंगे तीर्थाटन’ :उद्यापासून प्रारंभ

## जेष्ठांना मोफत, महिलांना माफक दरात प्रवास; ग्रुप बुकिंग केल्यास घरापासून सेवा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील एसटी महामंडळाच्या विविध आगारांच्या माध्यमातून श्रावण महिन्यानिमित्त तीर्थक्षेत्री जाण्यासाठी ‘श्रावणात एसटी संगे तीर्थाटन’ हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात येत आहे. यामाध्यमातून ज्येष्ठ नागरिक, महिला यांना मोफत आणि माफक दरात तीर्थाटनाचा आनंद घेता येणार असून महामंडळाने प्रवाशांनी या उपक्रमात जास्तीत जास्त फायदा घ्यावा असे आवाहन केले आहे.श्रावण महिन्यामध्ये अनेक ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते. त्या अनुषंगाने बहुतांश नागरिक कुटुंबासह तीर्थक्षेत्राला जाण्याचे नियोजन करतात. यासाठी एसटीने ‘श्रावणात एसटी संगे तीर्थाटन’ हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे.

एसटीच्या प्रत्येक आगारातून श्रावण महिन्यात एकदिवसीय अथवा एक मुक्कामी धार्मिक सहलीचे आयोजन करण्यात येत असून त्यामध्ये सर्व प्रकारच्या सवलती दिल्या जात आहेत. अमृतमहोत्सवी ज्येष्ठांना मोफत तर ज्येष्ठ नागरिक व महिलांना तसेच १२ वर्षाच्या आतील मुलांना अर्धे तिकीट आकारण्यात येते.

गावातील महिला बचत गट, ज्येष्ठ नागरिक संघ, विविध सेवाभावी संस्था यांच्या पुढाकाराने अशाप्रकारे सांघिक सहलीचे आयोजन केले जाते. त्र्यंबकेश्वर, भीमाशंकर, मारलेश्वर अशा तीर्थक्षेत्र बरोबरच अष्टविनायक, दर गुरुवारी नृसिंहवाडी,औदुबंर दर शनिवारी मारुती दर्शन अशा धार्मिक सहलीचे आयोजन केले जाते. सवलतीमुळे माफक दरात तीर्थाटन करण्याचा आनंद सामान्यांना मिळतानाच एसटीच्या प्रवासी संख्येत वाढ होण्यास मदत होणार आहे.राज्यातील ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, महिलांना प्रवासात पन्नास टक्के सवलत असे निर्णय राज्य शासनाने घेतले आहे. एसटीकडे प्रवाशांचा ओघ वाढतानाच कर्मचाऱ्यांनी चांगली सेवा आणि अभिनव उपक्रमांमुळे एसटीच्या उत्पन्नात भर पडेल अशी कामगिरी करण्याचे आवाहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी केले आहे.



# राम राऊत प्रतिष्ठानच्या दिव्यांग शिबिराला केज मधून उत्स्फूर्त प्रतिसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**



द ०३ ऑगस्ट रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा संकल्पना मनामध्ये बाळगून अखंड महाराष्ट्रा मध्ये मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांनी रुग्णसेवेचा महायज्ञ आपल्या आरोग्य सेवकां मार्फत महाराष्ट्र भर चालू ठेवला आहे. त्यांच्या आरोग्य सेवेचा भाग म्हणूनच याच आखाड्यातून तयार झालेले मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष प्रमुख मंगेशजी चिवटे यांचे विश्वासू असलेले शिवसेना वैद्यकीयचे राज्यप्रमुख रामहरी राऊत यांनी केज तालुक्यातील दिव्यांग बांधवासाठी मोफत हातपाय उपकरणे वाटप शिबीर घेऊन आपली आरोग्य सेवा केज वासियांसाठी अवगत केली आहे. हे शिबीर राम राऊत सामाजिक प्रतिष्ठान यांच्यामार्फत केज शहरात तीन ऑगस्ट व चार ऑगस्ट दोन दिवस ठेवण्यात आली आहे. या शिबिरात पहिल्याच दिवशी शेकडो दिव्यांग बांधवांनी मोफत हातपाय उपकरणे वाटपाचा लाभ घेतला आहे. शिबिराला संपूर्ण केज तालुक्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. या शिबिरामध्ये सुमारे बाराशे दिव्यांग बांधवांची मोफत तपासणी करून त्यांना मोफत दिव्यांग उपकरणे हात पाय वाटप करण्यात आले. हे शिबिर राम राऊत सामाजिक प्रतिष्ठान मार्फत घेण्यात आले. या शिबिराचे आयोजक श्री. रामहरी राऊत यांनी केले आहे. शिबिरात पहिल्याच दिवशी शेकडो दिव्यांग बांधवांना मोफत दिव्यांग उपकरणे व हात व पाय वाटप करून त्यांना मोफत सेवा देण्यात आली आहे. यावेळी शिबिरात शिवसेना वैद्यकीय राज्यप्रमुख रामहरी राऊत साहेब उपस्थित होते व तालुका प्रमुख पंजाबराव देशमुख, उप तालुका प्रमुख तानाजी धस, शहर प्रमुख बाळासाहेब पवार, अंबाजोगाई शहर प्रमुख ऋषिकेश भेय्या लोमटे, वैद्यकीय जिल्हाधक्ष महादेव मातकर, केज तालुका अध्यक्ष नवनाथ भाऊ लाड, बीड शहर अध्यक्ष रोहित धुरंधरे, उप तालुका प्रमुख अशोक घुगे, गौतम सातपुते, सुखदेव कापरे रुग्णसेवक नारायण सपकाळ, सरपंच मनोज राऊत तसेच शेकडो शिव सैनिक उपस्थित होते.

# धक्कादायक! कड्यात लाखोंचे भेसळ युक्त दूध पावडरच्या तब्बल ६०० बँग जप्त

## अन्न व औषध प्रशासन विभागाची मोठी कारवाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**



> जिल्हाधिकाऱ्यां कडून पाहणी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन रविवारी दिवस उगवायच्या आत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

गेल्या पाच ते सहा वर्षापासून बीड-नगर राष्ट्रीय महामार्गावरील टाकळी अमिया फाट्याजवळ असलेल्या एका गोडाऊनमध्ये भेसळयुक्त दुध तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पावडरचा ६०० गोण्या असलेला साठा अन्न सुरक्षा प्रशासन व पोलिसांनी धाड टाकुन जप्त केल्याची कारवाई रविवारी पहाटे करण्यात आली. एकाला ताब्यात घेण्यात आले असून अंबादास पांडुरंग चौधरी रा. टाकळी अमिया असे त्याचे नाव आहे. आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया येथील अंबादास पांडुरंग चौधरी याचे कडा येथील टाकळी अमिया रोडलगत साईदत्त एंटरप्राययजेस नावाने दुकान व लगत पत्र्याच्या शेडमध्ये गोडाऊन आहे. गोपनिय माहितीच्या आधारे अन्न व पोलीस प्रशासनाने रविवारी पहाटे या ठिकाणी धाड टाकली. गोडाऊनची पाहणी केली असता भेसळयुक्त दुधाची निर्मिती करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पावडरचा मोठा साठा आढळून आला. या कारवाईने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहेही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी संदिप देवरे, अनुराधा भोसले, सहाय्यक आयुक्त कांबळे,आष्टीचे पोलीस निरीक्षक विक्रांत हिंगे, सहायक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे, स्थानिक गुन्हे शाखा,पोलीस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे,पोलीस हवालदार बबुशा काळे, पोलीस नाईक प्रवीण क्षीरसागर, विकास जाधव अंमलदार मजरूद्दीन सय्यद,सचिन गायकवाड,दिपक भोजे, सचिन पवळ,महिला अंमलदार जिजाबाई आरेकर,अर्चना आरडे, यानी केली.


## चारोळी

स्वतःच काहीतरी
अस्तिव असावं
शब्द,विचार वाणीतून
ते थोडंतरी दिसावं.

रंजना सानप
मायणी (सातारा)









# बाळासाहेब आंबेडकर यांच्या आरक्षण बचाव यात्रेस सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहा - सविताताई मुंढे



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खासदार बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथून आरक्षण बचाव यात्रेला सुरुवात झाली आहे, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष सर्व आरक्षणवादी व बहुजन समाजातील जनतेला मार्गदर्शन करणार आहेत.

आरक्षण बचाव यात्रेची उद्दिष्टे OBC चे आरक्षण वाचले पाहिजे. SC, ST विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दुप्पट झाली पाहिजे.जइउ च्या विद्यार्थ्यांना SC, ST प्रमाणे शिष्यवृत्ती जशीच्या तशी लागू झाली पाहिजे.


वचित बहुजन आघाडी च्या वतीने मा. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली निघालेली एससी, एसटी, ओबीसी आरक्षण बचाव यात्रा ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजता सिंदखेड राजा शहरात येत आहे. राजमाता जिजाऊ राजवाडा जवळ आरक्षण यात्रेचे स्वागत करण्यात येईल, तरी या प्रसंगी शहर व परिसरातील एस सी एस टी ओ बी सी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीच्या उपाध्यक्षा सौ सविताताई मुंढे यांनी आज सिंदखेडराजा येथे विश्रामगृह येथे आयोजीत पत्रकार परिषदेत केले. मराठा समाजाला आरक्षण मिळावे या यासाठी कोणाचाही आक्षेप नाही मात्र ओ बी सी मधून आरक्षण देण्यास प्रचंड विरोध आहे. ओ बी सी आरक्षण टिकून राहावे यासाठी बाळासाहेब आंबेडकर हेच एकमेव असे नेते आग्रही आहेत असे सविता मुंढे यांनी सांगितले, देऊळगाव राजा येथून आरक्षण बचाव यात्रा मुख्य मार्गाने सिंदखेड राजा कडे रवाना होणार आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडी चे तालुका अध्यक्ष व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मला चारही बाजूने टार्गेट केलं जातय-माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील

## हर्षवर्धन पाटील यांनी केली नाराजी व्यक्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**



इंदापूर तालुक्यात गेली पंधरा वर्षे झालं राष्ट्रवादी आणि मित्र पक्षाकडून मला टार्गेट केल जात आहे.अशी खंत व्यक्त केली आहे ती म्हणजे माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी ते भिगवण ता.इंदापूर येथे पत्रकारांशी बोलत होते.

आमचा राष्ट्रवादी बरोबर सतत संघर्ष झाला असताना देखील कार्यकर्त्यांची ईच्छा नसताना देखील केवळ पक्षाचा आणि वरिष्ठांच्या आदेशाने युतीचा धर्म लोकसभेच्या निवडणुकीत आंम्ही पंधरा वर्ष झाले पाळत आहे.आघाडीत असताना देखील त्यांच काम केल,परंतु निवडणूक जवळ आली की मला टार्गेट केल जातय.माझ्या विरोधात कटकारस्थान करून मला राजकारणातून आणि समाजकारणातुन संपवण्यासाठीच मला टार्गेट केल जात आहे.असे पत्रकारांशी बोलताना पाटील म्हणाले. माझ्यावर सतत अन्याय होत आहे.आणि भाजप कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल झाले आहेत.

त्यामुळे कार्यरकर्ते प्रचंड नाराज आहेत. विधानसभेच्या जागावाटपाचा निर्णय काहीही झाला तरी विधानसभेची निवडणूक पुर्ण ताकतीने लढवणार आहोत,अशे ते शेवटी म्हणाले.

> भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते मारुती वणवे म्हणाले की हर्षवर्धन पाटील यांचे आणि माझे वयक्तिक संबंध आहेत.ते भाजपात नव्हते तरी मागील सर्व विधानसभेच्या निवडणुकीत मि हर्षवर्धन पाटील यांनाच मतदान केले आहे. आणि ईथून पुढेही त्यांनाच मतदान करत राहणार.

# नायगाव विधानसभेची निवडणूक सर्व ताकदीने लढवणार भाजपाचे नेते उद्योजक मारोतराव कवळे गुरूजी यांचा दावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

नायगाव विधानसभा मतदारसंघ भारतीय जनता पक्षाचे असल्याने आमची दावेदारी तर आहेच पण निवडणूक लढवण्यासाठी मी भाजप पक्षाकडे तसे उमेदवारी मागितली असून सर्व ताकतीने निवडणूक लढवणार असल्याचा दावा उद्योजक मारोतराव कवळे गुरूजी यांनी केला.

विधानसभा निवडणूकीसाठी भाजपाचे नेते तथा शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरूजी यांनी मतदारसंघात जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. नायगाव विधानसभा निवडणूक लढवण्यासंदर्भात कवळे यांनी आपली भुमिका स्पष्ट केली. नायगाव मतदारसंघावर आमची दावेदारी असून पक्षाकडे उमेदवारीची आम्ही केलेल्या विकास कामावरून आग्रहाची मागणी केली आहे. कारण नायगाव उमरी धर्माबाद आधी तिन्ही तालुक्यातील व्हीपीके गुरूजी उद्योग समुहाकडुन शेतक-यांचे हितजोपासत व बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळेल हा दृष्टीकोन ठेवून सिंधी येथील प्रयागनगरीत एक तर कुसूमनगर वाघलवाडा येथे दोन असे तिन कारखाने उभारून शेतक-यांची आर्थिक बाजू बळकट केलो तर बेरोजगाराच्या हाताला काम दिलो. ऐवढेच नाहीतर उमरी, धर्माबाद व नायगाव तालुक्यातील कै. व्यंकटराव पाटील कवळे पतसंस्थेच्या माध्यमातुन हजारो शेतकरी यांना शेतीजोड व्यवसाय माध्यमातून दुग्धव्यवसायासाठी गाईम्हैशी वाटप करण्यात आले. महिलाबचत गटांना रोजगार उपलब्धसाठी अर्थसाहाय्य केले. बेरोजगार युवकांना उद्योग व्यवसायसाठी मदत केलो.मी देशाचे ग्रहमंत्री तथा जलनेते स्वर्गीय शंकरराव चव्हाण, स्वर्गीय आमदार बाबासाहेब देशमुख गोरठेकर, माजी मंत्री स्वर्गीय गंगाधरराव देशमुख कुंटूरकर,स्वर्गीय आमदार बापुसाहेब देशमुख गोरठेकर तसेच राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण साहेब आधीने सहकारात सकारात्मक काम केलेल्या कार्याचे कार्यप्रणाली नुसार मी त्याचे आदर्श डोळ्यांसमोर ठेवून मतदार संघात उद्योगांच्या माध्यमातून शेतकरी,शेतमजूर, बेरोजगार सह सामन्यांतील सामान्यांचे विकास साधण्याचे काम केलो.मी केलेल्या कामाची पावती म्हणून खा.अशोकराव चव्हाण साहेबांनी भागातील शेतकरी शेतमजूर बेरोजगारांना कवळे गुरूजी न्याय देऊ शकतात या उद्देशातून कुसूमनगर वाघलवाडा साखर कारखाना हा शेतकऱ्यांच्या व बेरोजगार तरुण युवक यांच्या



हिताच्या दृष्टिकोनातून हा कारखाना मला विकत दिले.त्यांच्या विश्वासाने आज सर्व कारखाने यशस्वी वाटचाल करीत आहे.भागात शेतकरी आर्थिक बाजुने सक्षम झाला पाहिजे हे स्वर्गीय शंकरराव चव्हाण साहेब,बाबासाहेब देशमुख गोरठेकर,बापुसाहेब देशमुख गोरठेकर तसेच खा.अशोकराव चव्हाण साहेब यांचे स्वप्नन पुर्ण करण्यासाठी मी गावोगाव शेतक-यांच्या भेटीगाठी बैठका घेऊन ऊस पिक हे शाश्वत समजून उमरी, धर्माबाद, नायगाव, आधी तालुक्यात मोठ्याप्रमाणात लागवड करण्यात आले. कुसूमनगर वाघलवाडा येथे नवीन हरीतक्रांतीचे जनक लोकनेते शंकरराव चव्हाण यांच्या नावाने ही एक नवीन कुसूमनगर वाघलवाडा कारखाना नावाने उभारून तोही कारखाना सक्षम रित्या चालवित आहोत.पुढील आगामी काळात धर्माबाद तालुक्यात जनतेनी मला साथ दिले तर स्वर्गीय बाबासाहेब देशमुख गोरठेकर यांच्या नावाने उद्योग उभारुन भागाला न्याय मिळवून देऊ,त्याच पध्दतीने नायगाव तालुक्यात एमआयडीसी प्रमाणे येथे ही उद्योग उभारून न्याय देण्याचे काम करु.मागील काळात मी जिल्हा परिषद सदस्य असताना दिनदलीत दुबळ्यासह सामान्य जनतेचे कामे केले तसेच जि.प. कडून आलेला निधी गावांच्या सर्वांगिण कामे समजून गावातील सरपंचसह सदस्य व प्रतिष्ठिच्या माध्यमातून देण्यात आले होते.२०१९ च्या विधानसभेच्या माध्यमातून वंचित बहुजन पक्षांतर्गत निवडणुक माध्यमातून जनतेसमोर गेलो होते. तेव्हा एकच कारखाना होता. आता तिन कारखाने झाल्याने सर्वसामान्य, शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार तरूण, यांचा फायदा झाला. भागातील व्यापारपेठ वाढले यातुन जनसंपर्क वाढल्याने माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या कार्यप्रणालीवर मी विश्वास ठेवून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी चर्चा करूनच पक्ष कार्यालयात पक्ष प्रवेश घेण्यात आले. पक्षाचे धेयधोरण तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम करत आहे. खा. अशोकराव चव्हाण यांच्या आदेशानुसार लोकसभेचे तत्कालीन खासदार प्रतापरावपाटीलचिखलीकर यांच्या निवडणूकीत एकनिष्ठेने काम केलो. नायगाव मतदारसंघात खा. अशोकराव चव्हाण यांचे विकासाभिमुख नैत्रत्वाचे मतदार संघात विचार रूजूनगावपातळीवरील ग्रामपंचायती, सेवा सहकारी सोसायट्या, बाजार समित्या, इतर संस्थावर पक्षाचा झेंडा फडकविलो. त्यामुळे खा. अशोकराव चव्हाण यांचे आदेशानुसार मतदारांच्या ताकतीवर भाजप पक्षाच्या माध्यमातून निवडणुकीच्या मैदानात उतरण्याची तयारी करत आहे. तसे यामुळे सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. मी एक खा. अशोक चव्हाण यांचा विचाराचा पाईक भाजप पक्षाकडुन नवा चेहरा असल्याने मी केलेल्या तळागाळापर्यंत विकास कामावरून मतदार निश्चितच विचार करतील.

# विद्यार्थी,नागरीक,शेतकरी, आजारी व्यक्तींना चिखलमय रस्त्यावर चालतांना करावी लागते तारेवरची कसरत

## वाघाळा-फुलारवाडी रस्त्याची दयनिय अवस्था



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पाथरी । प्रतिनिधी

तालुक्यातील वाघाळा-फुलारवाडी या साडेतीन किमी अंतराच्या रस्त्याची अवस्था अतिषय दयनिय झाली असून या पाणी आणि चिखलय रस्त्या वरून चालतांना विद्यार्थी, नागरीक, शेतकरी,आजारीव्यक्ती यांना दर दिवशी तारेवरची कसरत करावी लागते. देशाच्या स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजरी झाली मात्र गेली काही दशके या रस्त्याची मागणी होत असतांना निववडणुकी वेळी पक्का रस्ता करून देण्याचे दर विळी केवळ पोकळ आश्वासनावर बोळवण केली जात असल्याचे वाघाळा ग्रामस्थ सांगतात.

वाघाळा-फुलारवाडी या पाणी आणि चिखलमय झालेल्या याच रस्त्याने फुलारवाडी आणि आदिवासी पारधी वस्तीवरील शाळाकरी मुले वाघाळा येथे प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत शिक्षण घेण्या साठी मोठी कसरत करत येत असतात. या सोबतच येथील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि तालुका,जिल्हा कचेरीची कामे करण्या साठी जाणा-या नागरीकांना ही याच चिखल,पाण्यातून वाट काढत पाई प्रवास करावा लागतो. पावसाळ्यात या रस्त्याची अशी दयनिय अवस्था होत असल्याने अनेक आजारी रुग्ण दवाखाण्यात पोहचण्या आधिच दगावल्याच्या घटना या आगोदर मोठ्या प्रमाणात झाल्या असून आदिवासी पारधी वस्ती वरिल अनेक गर्भवती महिलांची प्रसती रस्त्यात झाल्याच्या घटना ही घडलेल्या आहेत. दरवेळी निवडणुका आल्या की नेते पक्का डांबरी रस्ता तयार करून देण्याचे नवे आश्वासन देतात आणि पुन्हा पाच वर्ष फिरकत ही नसल्याने गत वेळी फुलारवाडी ग्रामस्थांनी मतदानावर बहिष्कार टाकला होता. या वेळी ही आश्वासनावर बोळवन करत नेत्यांनी वेळ मारून नेली होती. या वेळी जुनच्या पहिल्या आठवड्या पासून पावसाची रिपरीप सुरुच असल्याने शेती कामासाठी जाण्या साठी शेतक-यांना मोठी कसरत करावी लागत आहे.

# शिक्षक व ज्येष्ठ पत्रकार दिपक नागरे (दिसना) यांचा सेवा निवृत गौरव सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा

## सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी लावली हजेरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेडराजा । ज्ञानेश्वर बुधवत

मातृतीर्थ सिंदखेड राजा तालुक्यातील जेष्ठ पत्रकार तथा शिक्षक दीपक नागरे यांचा सेवा निवृत गौरव सोहळा आज दिनांक ४ ऑगस्ट रोजी पंचायत समिती सभागृहात सामाजिक राजकीय चळवळीतील मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ, व स्व.वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सेवा निवृत गौरव सोहळ्या साठी प्रमुख उपस्थिती म्हणून बहुजन पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष पुरुषोत्तम आवारे पाटील , प्रदिप रोडे, उपविभागीय पोलिस अधिकारी मनीषा कदम, सामाजिक




कार्यकर्ते दादासाहेब मुंढे बिड, सिद्धार्थ खरात, विनोद वाघ, डॉ. सुनिल कायंदे, यांच्या सह राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे मान्यवर मंडळी उपस्थित होती. या सोहळ्याचे प्रस्ताविक पत्रकार मुकुंद पाठक, यांनी तर सन्मानपत्राचे वाचन विनोद ठाकरे यांनी केले तर बहुजन पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम आवारे पाटील, मनीषा कदम, विनोद वाघ, दिनेश गीते, यांनी दिपक नागरे यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी दीपक नागरे यांचां सपत्नीक सत्कार मान्यवरांचे हस्ते करण्यात आला.यावेळी दीपक नागरे यांनी सत्काराला उत्तर देताना म्हटले की मी जरी सेवानिवृत्त झालो असलो तरी यापुढे एक जबाबदारी पार पडणार असून ती पूर्ण झाल्यानंतर मी आपणास सांगेल कारण ती जबाबदारी पत्रकारिता क्षेत्रातील असेल माझी जबाबदारी आता वाढली आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी असंख्य सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रात आसलेल्या मान्यवरांनी दीपक नागरे यांच्यावर पुष्पगुच्छ यांचा अक्षरशः पाऊस पाडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहित म्हस्के यांनी तर आभाप्रदर्शन प्रविण गीते यांनी केले कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावली होती.

# जिल्हा परिषद शाळेमध्ये अनेक तरुण करतात नशा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव (महादेव हरण)

सेनगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या पटांगणामध्ये अनेक तरुण स्टिकफास्ट च्या नशा करत असून अनेक नवतरुण या स्टिकफास्टच्या व्यसनाधीर जात आहे मार्केटमध्ये हि स्टिकफास्ट ८ते१० रुपयांमध्ये मिळत असून नवतरुण विद्यार्थी कापडाच्या पन्नी मध्ये टाकून नशा करतात सेनगाव शहरांमध्ये जनरल स्टोअर्सवर ही स्टिक फास्ट मिळत असून दुकानदार विद्यार्थी व लहान मुलांना ही स्टिकफास्ट पाचशे ते हजार रुपयाला विकतात आणि लहान मुले जिल्हा परिषद शाळेच्या पटांगणामध्ये स्टिकफास्ट कापडाच्या पन्नीमध्ये टाकून नशा करतात, जिल्हा परिषद शाळेमध्ये अनेक कापडांमध्ये स्टिकफास्ट आढळून आल्याने अनेक पालकाला प्रश्न पडला की शाळेमध्ये मुले पाठवा की नाही शाळेच्या नावाखाली अनेक तरुण विद्यार्थी व्यसन करत आहेत याकडे पोलीस प्रशासन लक्ष देणार का स्टिकफास्ट विकणारावर कारवाई करणार का, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार ,




# शेतकरी चळवळीचे प्रेरणास्थान मा.आमदार भीमरावजी धोंडे साहेब


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

भारत देश हा कृषिप्रधान देश आहे.भारतातील बहुसंख्य व्यक्ती आजही खेड्यामध्ये वास्तव्य करतात म्हणूनच भारत देश हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो.महात्मा गांधी नेहमी म्हणायचे 'खेड्याकडे चला' परंतु आधुनिक युगात जागतिकीकरण व आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे युवक युवतींना शहरी भागाचे आकर्षण वाढू लागलेले आपणास दिसून येते परंतु खरा भारत देश हा खेड्यातच आहे मात्र आज खेडी ओस पडू लागलेली आहे.शहरीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे कृषी प्रधान अर्थव्यवस्था मोडकळीस येऊ लागलेली आहे.

भारतात शेतकरी चळवळीस १९७० च्या दशकात चरण सिंग यांनी शेतकरी चळवळीचे नेतृत्व केले. महाराष्ट्रामध्ये १९८० मध्ये शरद जोशी यांच्या नेतृत्वात शेतकरी संघटनेची स्थापना करण्यात आली.महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी अहोरात्र झटणारे,आष्टी ते मुंबई,आष्टी ते दिल्ली पायी मोर्चा काढून शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी सतत प्रयत्न करणारे कुशल नेतृत्व म्हणजेच मा.आ.भीमरावजी धोंडे होय.बीड जिल्ह्याच्या राजकारणात मा.आमदार भीमरावजी धोंडे यांचे नाव आदराने व सन्मानाने घेतले जाते.शांत व संयमी नेतृत्व,जात-पात धर्म भेद न करता सरळ मार्गाने राजकारण करणारे,सतत शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी जागरूक असणारे कुशल नेतृत्व म्हणजेच मा आ.भिमरावजी धोंडे होय.कै.गोपीनाथराव मुंडे यांचे परममित्र म्हणून भीमरावजी धोंडे हे संपूर्ण महाराष्ट्रात परिचित आहेत.सर्वसामान्य लोकांच्या सुखदुःखात सहभागी होऊन त्यांना आधार देऊन, जनसामान्यात मिसळून त्यांचे प्रश्न प्रभावीपणे सोडविण्यासाठी सतत प्रयत्न करणारे कुशल नेतृत्व म्हणजेच मा.आमदार भीमरावजी धोंडे होय.

मराठवाड्यातील ग्रामीण भागात आजही अनेक शेतकरी विविध कारणास्तव आत्महत्या करताना दिसतात याचा सखोल अभ्यास मा. आमदार भीमरावजी धोंडे यांनी करून या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी मराठवाड्यातील ग्रामीण भागात मोठमोठ्या जलसिंचनाच्या सोयी असणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात पिक विमा योजना प्रभावीपणे राबवली गेली पाहिजे. ग्रामीण भागातील सावकाराच्या त्रासातून शेतकऱ्यांची मुक्तता झाली पाहिजे.शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे.दलाला कडून होणारी फसवणूक थांबली पाहिजे. पतसंस्था व ग्रामीण बँके मार्फत गरीब शेतकऱ्यांना अल्प व्याज दराने दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध झाले पाहिजे.ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुला मुलींना मोफत शिक्षण, वह्या पुस्तके वाटप, शिष्यवृत्ती व वसतिगृहाची सोय होणे गरजेचे आहे.ग्रामीण भागातील जातिव्यवस्था व अज्ञान अंधश्रद्धा कमी होणे काळाची गरज आहे. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करून त्याचे संवर्धन होणे आवश्यक आहे.ग्रामीण भागात सरकारी योजना योग्य प्रकारे पार पाडल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो.शेतकऱ्यांना बी बियाणे व रासायनिक खताची माहिती कृषी विभागांनी व्यवस्थित दिल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ



शकते. शेतकऱ्यांनी शेती व्यवसायाबरोबरच पशुपालन, कुकुट पालन,शेळीपालन व दुग्ध व्यवसाय करून उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करावा.कृषी अधिकाऱ्याचा सल्ला घेऊन शेतीतील उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन शेतकरी आत्महत्येपासून दुर होऊ शकतो असे मत मा.आमदार भीमरावजी धोंडे साहेब यांचे आहेत.

महाराष्ट्रातील बीड जिल्हा म्हणजे मागासलेला जिल्हा,शेतकरी, शेतमजुरांचा जिल्हा म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात परिचित आहे. बीड जिल्ह्याच्या राजकारणात मा. आमदार भीमरावजी धोंडे यांना शिक्षण महर्षी,दिन दलित, शेतकऱ्यांचे नेते म्हणून ओळखले जाते.सत्ता असो किंवा नसो सतत शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आंदोलने, मोर्चा, निषेध इत्यादी मार्गांचा अवलंब करून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात.आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील गरीब,दिन दलित,शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या मुला मुलींसाठी शिक्षणाची व्यवस्था व्हावी म्हणून त्यांनी' शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाची 'स्थापना केली.

आपल्या शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या द्वारे त्यांनी आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील हजारो युवक युवतींना रोजगाराची नवीन संधी मिळून दिलेली आहे.दीनदलित,गरीब शेतकरी,शेतमजुरांच्या मुला मुलींना नोकरीची संधी मिळाल्यामुळे बेरोजगारीवर मात करता आली.आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील गरीब,दिन दलित,शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नासाठी सतत आवाज उठवणारे प्रभावी कुशल नेतृत्व म्हणजेच मा.आमदार भीमरावजी धोंडे होय.शेतकऱ्यांच्या विकासासाठी बीड जिल्ह्यातील आष्टी सारख्या दुष्काळी भागात कृषी प्रदर्शन भरवणारे कुशल नेतृत्व म्हणजेच मा. आमदार भीमरावजी धोंडे होय म्हणूनच त्यांना शेतकऱ्यांचे नेते म्हणून ओळखले जाते.आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील शेतकऱ्यांना शेतीविषयक अधिक माहिती मिळविण्यासाठी त्यांनी दुसर्यांदा २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीमध्ये आष्टी येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाच्या समोर कृषी प्रदर्शन आयोजित केलेले आहे

शेतकऱ्यांच्या मुला मुलीने उच्च शिक्षण घेऊन यूपीएससी व एमपीएससी मध्ये आपले नाव लौकिक करावे म्हणून त्यांना प्रेरणा देण्यासाठी त्यांनी ११ लाख रुपयाचे बक्षीस जाहीर केलेले आहे.आष्टी पाटोदा शिरूर या भागातील गरीब शेतकऱ्यांच्या मुला मुलीने उच्चपदस्थ अधिकारी व्हावे,आपल्या आई-वडिलांची सेवा करावी व समाजाची सेवा करावी अशी त्यांची मनोभावना कायम असते म्हणूनच त्यांनी उच्च शिक्षणाचे केंद्रबिंदू आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात निर्माण करून शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली करून ठेवलेली आहेत. आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील गरीब,दिन दलित, शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नासाठी सतत आवाज उठवणारे प्रभावी कुशल नेतृत्व म्हणजेच मा.आमदार भीमरावजी धोंडे होय.शेतकऱ्यांच्या विकासासाठी बीड जिल्ह्यातील आष्टी सारख्या दुष्काळी भागात कृषी प्रदर्शन भरवणारे कुशल नेतृत्व म्हणजेच मा.आमदार भीमरावजी धोंडे होय म्हणूनच त्यांना शेतकऱ्यांचे नेते म्हणून ओळखले जाते.आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील शेतकऱ्यांना शेतीविषयक अधिक माहिती मिळविण्यासाठी त्यांनी यावर्षी २९ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीमध्ये आष्टी येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाच्या समोर वर्ष दुसरे कृषी प्रदर्शन आयोजित केलेले आहे तरी सर्व शेतकरी बांधवांनी या कृषी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा.

-प्रा.सुनील बाळकृष्ण भोज
(पंडित जवाहलाल नेहरू
उच्च माध्यमिक विद्यालय आष्टी)

# ठाकरे सेनेचा ढाण्या वाघच गद्दाराला आपली जागा दाखवू शकतो-शुभांगी ताई पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**





मेहकर दि.४ ठाकरे सेनेचा ढाण्या वाघच गद्दाराला आपली जागा दाखवू शकतो असे वक्तव्य शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेता शुभांगीताई पाटील यांनी महाआरोग्य शिबिर उद्धाटन प्रसंगी केले उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसा सप्ताह समाप्ती निमित्त जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांनी आयोजित केलेल्या महाआरोग्य रोगनिदान उपचार व शस्त्रक्रिया शिबिरात त्या बोलत होत्या त्यापुढे म्हणाल्या गद्दारांच्या दिम तीला सगळ्यात पुढे असलेल्याला आपली जागा दाखवून देणे शिवसेनेचे आद्य कर्तव्य आहे व डॉ. बछिरे सारखा शिवसैनिक याचं उत्तर देऊ शकतो शिवसेनेचे एक वर्षाचं पीक कापून नेले पण अस्सल बियाणं उद्धव साहेब ठाकरे यांच्या जवळ शिवसैनिकाच्या रूपाने आहे याला कोणी चोरू शकत नाही

जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांनी डॉ. बछिरे यांच्या संघटन कौशल्याचा तोंड भरून कौतुक केले व शिवसेना फुटी नंतर मेहकर लोणार मतदार संघ बांधणीचं काम ज्या पद्धतीने व निर्भिकपणे डॉ. बछिरे ने केले ते कौतुकास्पद आहे त्यांनी अनेक मेळावे, अनेक शिबिर व अनेक आंदोलनाच्या माध्यमातून आपल्या ओळखीचा ठसा उमटवला त्यातीललच एक म्हणजे हे महाआरोग्य रोग निदान उपचार व शस्त्रक्रिया शिबिर ज्याचा सर्वसामान्य जन माणसाला फायदा होत आहे. या शिबिराचे आयोजक डॉ. गोपाल बछिरे यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये म्हटले की, आम्ही उद्धव साहेबांचे शिवसैनिक आहोत आम्ही दरवर्षी साहेबांचा वाढदिवस समाज उपयोगी कार्यक्रम घेऊन करतो, आम्ही बाया नाचवत नाही, आम्ही ऑर्केस्ट्रा वाजवत नाही, आम्ही उगाच खर्च करत नाही, आम्ही समाज उपयोगी कार्य करून त्याचा समाजास लाभ देण्याचे प्रयत्न करतो वाढदिवस सप्ताह निमित्त आम्ही शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले, छत्रीचे वाटप केले, रेनकोटचे वाटप केले, गोरगरिबांना ब्लँकेटचे वाटप केले, सरकारी दवाखान्यात फळांचे वाटप केले, अनाथांना मिठाईचे वाटप केले आणि हा सप्ताह महाआरोग्य रोगनिदान, उपचार व शस्त्रक्रिया शिबिराने समाप्ती करत आहोत.

अध्यक्षीय समारोपात जिल्ह्याचे संपर्कप्रमुख नरेंद्र खेडेकर यांनी या स्तुत्य उपक्रमाची भरभरून स्तुती केली आणि डॉ. बछीरे यांनी दरवर्षी उद्धव साहेबांच्या वाढदिवसानिमित्त घेतलेल्या कार्यक्रमांची तोंड भरून स्तुती केली .या शिबिरासाठी संभाजीनगर येथील एम हॉस्पिटल, अल्पाइन हॉस्पिटल, सनशाइन हॉस्पिटल व रुणवाल हार्ट केअर हॉस्पिटल ची वेगवेगळी टीम आलेली होती या शिबिरात ५१७ रुग्णांची तपासणी झाली त्यापैकी १२८ रुग्णांचे डोळ्याचे ऑपरेशन करण्याचे, नऊ हृदय शस्त्रक्रिया व अस्थिरोगाचे ४२ शस्त्रक्रियाचे ठरले आहे व संपूर्ण शस्त्रक्रिया ह्या मोफत होणार आहेत या कार्यक्रमासाठी मेहकर विधानसभा संपर्कप्रमुख नंदलाल जाधव महिला जिल्हा संघटिका जिजाबाई राठोड, उद्योजक भास्करराव जी गारोळे, मेहकर तालुकाप्रमुख लिंबाजी पांडव, शहर प्रमुख किशोर गारोळे, लोणार शहर प्रमुख गजानन जाधव, नगरसेविका सिंधुताई जाधव, संदीप गारोळे, श्रीकांत नागरे, परमेश्वर दहातोंडे, राजीव बुधवत, जीवन घायाळ, श्रीकांत मादनकर, लूकमान कुरेशी, इकबाल कुरेशी, नारायण बळी, रमेशबापू देशमुख एड. संदीप गवई, पोर्णिमाताई गवई, पार्वतीताई सुटे, शालिनीताई मोरे, राजू दहातोंडे, राजू जयस्वाल, डॉ. मोहसीन शेख हे मंचकावर उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवसेना महिला जिल्हा संघटिका संजीवनी वाघ यांनी केले तर आभार युवा तालुका अधिकारी जीवन घायाळ यांनी मानले.

# साहित्यातून मुलांचे वैचारिक कुपोषण थांबावे-बालकुमारच्या ह. मो. मराठे



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । प्रतिनिधी**

साहित्यातून मुलांना माहिती देताना सामाजिक जीवनातील अनेक गोष्टी त्यांना समजतील की नाही, म्हणून लेखक बऱ्याच वेळा काही गोष्टी सांगतच नाहीत. त्यामुळे बऱ्याचशा माहितीपासून मुले वंचित राहतात. मुलांना सर्वार्थाने सक्षम बनविण्यासाठी समाज जीवनातील सर्वच गोष्टी कळाल्या पाहिजेत, तरच साहित्यातून मुलांचे होणारे वैचारिक कुपोषण थांबेल, असे मत जेष्ठ अभ्यासिका डॉ. मुक्तजा मठकरी यांनी रविवारी व्यक्त केली.

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था व डॉ. अमृता मराठे यांच्यातर्फे मुलांसाठी ज्येष्ठ साहित्यिक, संपादक ह. मो. मराठे कथालेखन कार्यशाळा व स्पर्धेचे डहाणूकर कॉलनीतील सरस्वती विद्या मंदिर शाळेत आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत 'कथा स्वरूप व वैशिष्ट्ये' या विषयावर मठकरी यांनी मुलांना मार्गदर्शन केले, त्यावेळी त्या बोलत होत्या. या वेळे अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू, कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी, कोषाध्यक्ष संजय ऐलवाड, डॉ. अमृता मराठे, वैदेही इनामदार तसेच कार्यकारिणी सदस्य आदी उपस्थित होते.

> **धुवादार पावसात रंगली कार्यशाळा सकाळपासून शहरात धुवाधार पावसाला सुरुवात झाली. अशा पावसातही शहराच्या विविध भागातून मुले कथालेखन कार्यशाळेसाठी हजर झाले. त्यामुळे बाहेर धुवाधार पाऊस आणि डहाणूकर कॉलनीतील सरस्वती विद्या मंदिरात कथालेखन कार्यशाळेत मुले मग्न! असे दृश्य होते. मुले कथा, कथेचे सूत्र, कथेतील पात्र, वातावरण निर्मिती, भाषा, प्रसंग आधी गोष्टी समजून घेत होते. मुलांसोबत पालक, शिक्षक आणि साहित्यिकही या कथालेखन कार्यशाळेत रमले होते.**

मठकरी म्हणाल्या, साहित्यातून मुलांना समाज जीवन कळण्यास मदत होते. मुले जे वाचतील त्यावर विश्वास ठेवतात. त्यामुळे एखादी गोष्ट मुलांना आत्ताच सांगायला नको. त्यांना आत्ता समजणार नाही, कळणारच नाही असे समजण्याचे कारण नाही. त्यांना सर्व गोष्टींची माहिती साहित्यातून मिळाली पाहिजे अशी अपेक्षा मठकरी यांनी व्यक्त केली.

कथा छोटी असावी. त्यात नावीन्य असावे. कथेतील नावीन्य हे साहित्य कालातीत करत असते. कथेत जाणिवांचा विस्तार झाला, की कथा अधिक फुलत जाते. वाचकांच्या मनालाही भिडत असते. कथेत सूचकता महत्त्वाची असते. लेखक कथा ठरवून लिहितो. त्यामागे त्यांचा प्रचंड अभ्यास आणि अनुभव असतो. वाचकांना कथेतील रिकाम्या जागा वाचता आल्या पाहिजे, कारण त्या जागा अर्थपूर्ण असतात. लेखक कायम प्रश्न विचारत असतो. ते प्रश्न वाचकांना वाचता आले पाहिजे असेही मुक्तजा मठकरी यांनी सांगितले. डॉ. अमृता मराठे यांनी प्रास्ताविक केले. वैदेही इनामदार यांनी सूत्रसंचालन केले.

# आगामी विधानसभेची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाकडून लढविणार-येईलवाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

लोहा-कंधार आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने तालुक्यांतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी शरदचंद्र पवार साहेबांच्या पक्षावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांची आढावा बैठक कंधार येथे पार पडली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष दिगंबर पेठकर,प्रमुख मार्गदर्शक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे महाराष्ट्र ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष रामचंद्र येईलवाड हे उपस्थित होते.

या आढावा बैठकीचे सूत्रसंचालन शेख रहमत अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष यांनी केले तर प्रस्तावना अंगद केंद्रे तालुकाध्यक्ष कंधार यांनी केले,

यावेळी उपस्थित तन्वीरोद्दिन जिल्हा उपाध्यक्ष,परसराम केंद्रे ओबीसी तालुका अध्यक्ष,शेतकरी चळवळीचे नेते गोविंदराव लोंढे,शाहीर सदाशिवराव कोल्हे ,रामकिशन पाटील घोरबांड,बालाजी पाटील इंगोले माजी सरपंच,प्रभाकर पाटील कदम,माजी सरपंच मारुती कोटेवाड सरपंच प्रतिनिधी यासह अनेक कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

बूथ कमिटी, कार्यकर्त्यांशी येणाऱ्या निवडणुकीत लोहा-कंधार विधानसभा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ला मिळावा याच्यावर चर्चा करण्यासाठी ही



बैठक आयोजित केली होती,

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे महाराष्ट्र ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष येईलवाड यांनी आढावा बैठकित उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की नांदेड जिल्ह्यातील ९ विधानसभा पैकी ३ जागा आमच्या वाट्याला होत्या नांदेड जिल्ह्यात महविकास आघाडी मध्ये प्रत्येकी ३-३ जागा सुटतील पण वसंत चव्हाण ने बंडखोरी करत निवडणूक लढवली होती,व ती जागा काँग्रेस ला गेली त्यामुळे आमच्याकडे २ जागा राहिल्या १ ली किनवट तर दुसरी लोहा-कंधार मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेसाच आहे व हा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटालाच सुटणार असे ते यावेळी म्हणाले आगामी लोहा-कंधार विधानसभेची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाकडून मी स्वतः लढविणार आहे असे येईलवाड म्हणाले.

यावेळी पुढे बोलताना म्हणाले की महाराष्ट्र ओबीसी आघाडीच्या २ बैठका झाल्या त्यामध्ये १० ते १२ जागा ओबीसीतील नवीन चेहरे उमेदवार म्हणून पवार साहेब देणार आहेत असे रामचंद्र येईलवाड म्हणाले.

महाराष्ट्राच्या राजकारणात व सामाजिक चळवळीमध्ये त्यांचे मोठे योगदान आहे.लोहा-कंधार मतदार संघामध्ये ही ओबीसी विरुद्ध मराठा उमेदवार असा सामना होणार असल्याचे बोलल्या जात आहे.लोहा कंधार मतदारसंघांमध्ये ओबीसीची लाट असल्यामुळे अनेक ओबीसी चे उमेदवार गुडघ्याला बाशिंग बांधून मीच निवडणूक लढवणार असल्याचे सांगण्यात आले, ओबीसी बांधवाकडून ओबीसी समाजाला एकजूट करण्यासाठी वेगवेगळ्या सर्कल मध्ये ओबीसी मेळावे ही घेतल्या जात आहेत. हे मेळावे आरक्षण वाचवण्यासाठी असले तरी या मेळाव्यात मात्र विधानसभेचा उमेदवार कोण याचीच चर्चा होताना दिसत आहे,शरद पवार गटाचे महाराष्ट्र ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष रामचंद्र येईलवाड पण विधानसभे साठी इच्छुक आहेत,

# सर्व समाज घटकांना सोबत घेवुन मतदार संघाचा विकास केला-ना.संजय बनसोडे

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा सर्व माता भगिनींनी लाभ घ्यावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । प्रतिनिधी**





उदगीर मतदार संघातील जनतेने मतदान रुपी आशिर्वाद दिल्यानंतर मागील ५ वर्षाच्या काळात उदगीर मतदार संघात विकासाचा डोंगर उभा केला. रस्ते, वीज, पाणी व आरोग्यासह नागरिकांना मुलभुत सुविधा उपलब्ध करुन दिल्या. विविध इमारतीसह प्रत्येक समाजातील घटकाला केंद्रबिंदू मानून सर्व समाज घटकांना सोबत घेवुन मतदार संघाचा विकास केला असल्याचे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले.

ते लोहारा ता.उदगीर येथील विविध विकास कामांच्या भुमीपुजना सोहळ्याप्रसंगी बोलत होते. ना.संजय बनसोडे यांनी लोहारा येथील ग्रामदैवत महादेव मंदिर माळ बेट व गैबुसाब दर्गा उरूस यात्रेस भेट देवून दर्शन घेतले.यावेळी माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, भाजपाचे प्रवक्ते शिवानंद हैबतपुरे, बालाजी भोसले, शिवशंकर धुप्पे, सुनिल केंद्रे, श्याम डावळे, वसंत पाटील, सुशांत शिंदे, प्रवीण सुरडकर, सायस दराडे, सरपंच गणपत कांबळे, सुभाष कांबळे , श्याम सोनटक्के, चंदु भातमुडे, बबन धनबा, करखेलीचे सरपंच दिलीप शिंदे, उपसरपंच शंकर भातमुडे, मनोहर देवंग्रे, दिलीप पाटील, विजय कांबळे, उध्दव रक्षाळे, माधव कांबळे, अरविंद गिलचे, संदीप धनुरे, सतिश गायकवाड, विजयकुमार हेडगे, शेषराव हेळगे, ग्रामसेवक गजानन भोसले, एस.आर. कांबळे, प्रकाश हैबतपुरे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, लोहारा येथील विविध विकास कामांसाठी कोट्यावधीचा निधी उपलब्ध करुन दिला असुन आज आपण बुध्द विहारासाठी २५ लक्ष रु., डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी १० लक्ष, महादेव मंदिर बेट सभागृह बांधकामासाठी १० लक्ष, नरसिंगवाडी सभागृहासाठी ८ लक्ष, महादेव मंदिर प्रवेशव्दारासाठी १० लक्ष, मज्जीद ते उदगीर लातूर सी.सी. रोड १७ लक्ष, बालाजी रक्षाळे घराकडे जाणारा रस्ता १० लक्ष, मुस्लिम कब्रस्तान संरक्षण भिंत बांधकामासाठी ६ लक्ष रुपये असे एकुण ९६ लक्ष रुपयाच्या कामाचे भुमीपुजन करण्यात आले आहे. मागील ५ वर्षाच्या काळात आपण केलेली कामे जनतेपर्यंत पोहचवा. आपण केलेल्या कामामुळे जिल्ह्यात फक्त उदगीर मतदार संघाच्या विकासाची चर्चा आहे. भविष्य काळात मतदार संघाच्या विकासासाठी एकसंघ राहून विकास करु त्यामुळे गटतट विसरून विकासासाठी एकत्र या असे आवाहन करुन शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे त्यांच्या पाठीशी मी सदैव आहे. मागील काळातील आपल्या मतदार संघातील

शेतक-यांच्या विम्याच्या प्रश्नासंदर्भात आपण स्वत: विमा कंपनीला आदेश दिले आहेत. महायुती सरकारने शेतक-यांना मोफत वीज देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. उदगीर मतदार संघात सौर ऊर्जेचे प्रकल्प उभारल्यामुळे या भागातील नागरीकांना भविष्यात २४ तास वीज मिळणार आहे. राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' मतदार संघात प्रभावीपणे राबवुन रक्षाबंधन पर्यंत माझ्या पात्र झालेल्या बहिणीच्या खात्यावर रक्कम जमा होईल. थोड्याच दिवसात मतदार संघातील विविध विकास कामांचे लोकार्पण सोहळे आपण घेणार असून उदगीर जिल्हा झाला पाहिजे म्हणून आपण सुविधा उपलब्ध केल्या आहेत. भविष्यात उदगीर जिल्हा करण्यासाठी आपण आग्रही मागणी केली आहे. महाराष्ट्रात छोट्या जिल्ह्यांची निर्मिती होईल तेंव्हा आपल्या उदगीरचा नंबर पहिला असेल असे आश्वासन ना.संजय बनसोडे यांनी सांगितले. यावेळी लोहारा गावासह पंचक्रोशीतील भाविक - भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर आयोजित अमरनाथ महाप्रसादाचा शेकडो भाविकांनी घेतला लाभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

स्वामी समर्थ मंदिर, सोमेश कॉलनी नांदेड येथे शनिवारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.नांदेड जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरु असल्यामुळे अनेकांनी हा कार्यक्रम पुढे ढकलण्याचा सल्ला दिला. परंतु दिलीप ठाकूर यांनी परमेश्वरावर विश्वास ठेवून कार्यक्रम करण्याचा निश्चय केला.सुदैवाने शनिवारी पाऊस न पडल्यामुळे महाप्रसादा मध्ये कोणताही व्यत्यय आला नाही. जयश्री व दिलीप ठाकूर यांच्या हस्ते सकाळी अभिषेक व दुपारी महाआरती करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.दिलीप ठाकूर यांनी विक्रमी तब्बल २४ वेळा अमरनाथचे,२७ वेळा वैष्णोदेवीचे आणि २९ वेळा अमृतसर येथील सुवर्णमंदिराचे दर्शन घेतल्याबद्दल डॉ.रमेश नारलावार शशिकांत पाटील, गणेश कोकुलवार, महेश देबडवार,विकास परदेशी,राजेश देशमुख,उमेशगुरु तळणकर, बालूमहाराज वैष्णव यांनी सत्कार केला.हृदयनाथ सोनवणे,नागेश शेट्टी,रेखा भताने,डॉ.द्वारकादास नखाते,केदार मालपाणी,डी.एच.अग्रवाल,

अनंतराव कवठेकर,सुभाष वलबे,रामेश्वर वाघमारे, प्रदीप माळेगावे, आनंद साताळे,अपर्णा कुलकर्णी,अमरनाथ शिखरे पाटील,प्रफुल्ल नागरगोजे,सुरेखा रहाटीकर,बालाजी जाधव

यांनी अमरनाथ यात्रेत अन्नदान केल्याबद्दल त्यांचा एक मुखी रुद्राक्ष, मोत्याची माळ देऊन सन्मान करण्यात आला.दिलीप ठाकूर यांच्या विविध उपक्रमात सक्रिय सहभागी होणारे ड.बी.एच.निरणे,सतीश शर्मा, बलवीरसिंह ठाकूर,रवी कडगे,प्रा. लक्ष्मी पूरणशेट्टीवार, तुकाराम इंद्राळे,शिवा शिंदे,शिवाजी पाटील, आनंदीदास देशमुख, शंकर परकंठे, जगदीश आसवा, राजू मोरे, जयंतीलाल पटेल, नीता दागडिया, रवी पोतदार,अतुल बियानी,स्नेहलता उत्तरवार, प्रिया चौधरी,प्रगती निलपत्रेवार यांना गौरविण्यात आले.अनिलसिंह हजारी, संतोष परळीकर, गोपाळ माळगे,मारोती कुमार, वैशाली देबडवार, प्रणिता देशमुख या भाजप पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.



ज्येष्ठ पत्रकार सुनील मुळे, रमेश देवडे, शीलरत्न लोखंडे, कैलास जाधव यांच्यासह अनेक माध्यम प्रतिनिधींचा सन्मान करण्यात आला.सुगनचंदजी शर्मा,बलभीम पत्की,शशिकांत कुलकर्णी,कल्याण शिरसीकर अशोक गरुडकर,राजू बच्चेवार,डॉ.अरुण हिवरेकर,मुकेश पटेल,योगेश पटेल, एकनाथ ब्राह्मणवाडेकर, नारायणसिंग चौहान , पद्माकर केंद्रे, प्रा.हवगीराव साताळे, एन. एन.भालेराव, हनुमानसिंह चौहान,विजयसिंह चौहान,डॉ.सतीश चौहान,इंगळे,दिलीप माने, डॉ.विलास चाटे,बालाजी बामणे ,भास्कर स्वामी, साईनाथ पदमवार, गणेश आरुटवार, संतोष पालेकर यांच्यासह शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वामी समर्थ मंदिराचे हेमंत गिते,राजेशसिंह ठाकूर, प्रकाश उंटवाले, जगतसिंह ठाकूर, संतोष बच्चेवार, सुभाष देवकते,सुरेश शर्मा,कैलाश महाराज, सुरेश निलावार,विजय वाडेकर,अर्जुनसिंह ठाकूर,अशोक साखरे,राजेश यादव,रिंकू सावळे,शुभम येडके यांनी परिश्रम घेतले.

> **तेवीसावी व चोविसावी अमरनाथ यात्रा तसेच पंधरावी व सोळावी चारोधाम यात्रा यशस्वी झाल्या प्रित्यर्थ धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांनी आयोजित केलेल्या महाप्रसादाचा शेकडो भाविकांनी महाप्रसाद ग्रहण केला असून यावेळी तेवीसाव्या अमरनाथ यात्रेमध्ये अन्नदान करणाऱ्या अन्नदात्यांचा, भाऊचा माणुसकीचा फ्रिज, लायन्सचा डबा, क्षुधा शांती या उपक्रमातील दानशूर नागरिकांचा तसेच अमरनाथ यात्रेला विस्तृत प्रसिद्धी देणाऱ्या माध्यम प्रतिनिधींचा यथोचित सत्कार करण्यात आला.**

## स्व.वैभवदादा देशमुख यांचा स्मृति दिना निमित्त शालेय साहित्य वाटप



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**

स्व. वैभवदादा विजयराव देशमुख प्रतिष्ठान यांचा वतीने स्व, वैभवदादा देशमुख यांचा स्मृतिदिन निमित्ताने ओतूर परिसरातील चैतन्य विद्यालय,गाडगे महाराज विद्यालय, जि. प. प्राथमिक शाळा विजेविहिरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्ता अंगणवाडी या शाळामधील गरीब व गरजवंत विद्यार्थ्यांना १५०० वही, शालेय युनिफॉर्म, दप्तर, कंपास, ई. शालेय साहित्य तसेच शाळेसाठी व्हाईट बोर्ड या वस्तूंचे वाटप प्रतिष्ठान मार्फत करण्यात आले. यानिमित्ताने शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हापातळीवर यश संपादन केलेल्या विध्यार्थ्यांचा प्रतिष्ठानचा वतीने सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. स्व. वैभवदादा देशमुख यांचा स्मृतिदिनी विविध शाळामध्ये रुक्षारोपण देखील करण्यात आले.या कार्यक्रमास ओतूर गावाचा सरपंच छायाताई तांबे, अनिलशेठ तांबे, उपसरपंच प्रशांत डुंबरे. प्रतिष्ठानचे सदस्य पोपट नलावडे, मेघना देशमुख, मंगेश डुंबरे, वैशालीताई घाटगे, प्रवीण देशमुख, दिपक डुंबरे, रोहिदास डुंबरे, राजुशेठ काकडे, किशोर कवडे, संदेश पानसरे, सुरेखा ताजवे, दीपक देशमुख, सुशील हिंगणे, शेखर घोलप,यतिश येरंडे, अभिनव डुंबरे. तसेच शाळेचे मुख्याध्यापक कैलास महाजन, राजश्री भालेकर, वारुळे सर. पोकळे सर, सुनील खूपसे, मनीषा पाटील, शरद माळवे, पी. बी. गाढवे, पंकज घोलप अदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खाडे सर, अहिनवे सर, नितीन खेत्री यांनी केले, तर आभार प्रदर्शन शोभा तांबे, मिलिंद खेत्री, यांनी केले.

# सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने मातंग समाजाच्या वतीने जल्लोष

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**



सखल मातंग समाजाच्या वतीने फटाके फोडून व पेडा भरून पानसरे चौकासह डॉ. अण्णा भाऊसाठे चौक, लहुजी साळवे चौकामध्ये जल्लोष साजरा करण्यात आले. (ता.१) ला सर्वोच्च न्यायालयाने शोषित वंचित व भटक्या समाजाला न्याय देणारा निकाल दिला आहे.सर्व राज्यांना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (डउ,डढ) प्रवर्गातील समाजाला आरक्षणामध्ये उपवर्गीकरण सर्वच राज्यांना करता येणार आहे असे सर्वोच्च न्यायालयाने निकाली दिले आहे. यामध्ये बऱ्याच राज्यांमध्ये पूर्वी उपवर्गीकरण (आरक्षण)अ, ब, क, ड, असे लागू होते. पण २००४ साली त्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगती दिली होती. (ता. १)रोजी सर्वोच्च न्यायालयाने ते स्थगती उठवण्यात आले.व्ही. जी. डोईवाड, बी. एम. गोणारकर, पी. डी. गोणारकर, जी. आर. गोणारकर, नरेश रेड्डी,लक्ष्मण निदानकर,मा. नगरसेवक संजय पवार,आडेलू वाघमारे,सत्यनाराय पवळे,गणपत जटाळकर,विठ्ठल शिंदे,सज्जन गडोड,लक्ष्मीकांत बाजनवाड, रामदास पवळे,बाबुराव गोणारकर, नागनाथ गोणारकर सुनील गोणारकर,चंद्रकांत गोणारकर, श्रीकांत गोणारकर,अनिल गोणारकर, विशाल इबितवार,विजय गोणारकरसह या जल्लोषमध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच सर्व मातंग समाज उपस्थित होता.

लोकस्वराज्य आंदोलनचे प्रा. रामचंद्र भरांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व मातंग समाजा विधानसभा,विधानपरिषद यांच्यावर अ. ब. क. ड. आरक्षण वर्गीकरण करण्यात यावे यासाठी मोर्च्या काढण्यात आले. नागपूर ते हिवाळी अधिवेशन चालू आस्थाना मोर्चा काढल्या असत्या लोकस्वराज्य आंदोलनाच्या मोर्चावर लाठी चार्ज करण्यात आले होते.नांदेड येथे लोकस्वराज्य आंदोलनच्या संस्थापक प्रा. रामचंद्र भरांडे यांनी नांदेड येथे अमरण उपोषण १०.दिवस करण्यात आले होते.प्रा. रामचंद्र भरांडे यांची तबियत खालवत आहे असे माहिती मिळताच तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रा. रामचंद्र भरांडे यांनाच्याशी दूर्ध्वनीवरून संपर्क साधून असे म्हणाले की लवकरात लवकर हा प्रश्न मार्गी लावू त्यानंतर प्रा. रामचंद्र भरांडे यांनी अमरण उपोषण मागे घेण्यात आले.

# खानापूर येथे मनोज दादा जरागे पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप व वृक्षारोपण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

तालुक्यातील खानापूर येथील सकल मराठा समाज व समस्त ग्रामस्थ यांच्यावतीने संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जि.प.प्रा.शाळा येथे शालेय साहित्य वाटप करण्यात आले तर गावात वृक्षारोपण करण्यात आले आहे.

मराठा आरक्षणासाठी लढा उभा करणारे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी तालुक्यातील खानापूर येथे विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले. यामध्ये येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले तर गावात विविध ठिकाणी वृक्षारोपण करून सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक, सरपंच, ग्रा.प.सदस्य.सकल मराठा समाज व ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले.

> **मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आमच्या खानापूर गावात जि.प.प्रा.शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचं वाटप व वृक्षारोपण केले. जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे आमच्या गावातील संपूर्ण मराठा समाजाच्या कुणबी नोंदी आढळलेल्या आहेत.व गावातील संपूर्ण मराठा समाज ओबीसी आरक्षणात आलेला आहे. हे सर्व श्रेय आमच्या जरांगे पाटलांचे आहे. राज्य सरकारने लवकरात लवकर हैदराबाद गॅजेट, सातारा संस्थांचे दस्तऐवज घेऊन महाराष्ट्रातील संपूर्ण मराठा समाजाला ओबीसी मध्ये आरक्षण द्यावे.**
>
> **– प्रेमकुमार तावरे पाटील**
> **सामाजिक कार्यकर्ते**

## कृषि महाविद्यालय,पाथरी तर्फे हिस्सी येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेलू । प्रतिनिधी**

सेलू तालुक्यातील हिस्सी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पाथरी जि. परभणी द्वारे मौ. हिस्सी येथील विठ्ठल रूक्मीनी मंदीर सभागृहात शेतकरी मेळावा आयोजीत केला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश मुळे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणुन डॉ. जी. डी. गडदे, व्यवस्थापक व डॉ. डी. डी. पटाईत, शास्त्रज्ञ किटकशास्त्र, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, वनामकृवि, परभणी हे उपस्थित होते. कार्यक्रमास श्री. दिपक गोरे (सरपंच), श्री. राजहंस खरात (मंडळ कृषि अधिकारी), श्री. चंद्रहास मगर, श्री. आत्माराम थोरे, प्रा. अमोल लाड, श्री. भगवानराव गात, श्री. ज्ञानेश्वर गायकवाड (पत्रकार) व गावातील शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. विजय थोरे यांनी केले. डॉ. जी. डी. गडदे यांनी कापुस व सोयाबीन पिकातील सद्यस्थितीतील व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. डी. डी. पटाईत यांनी कापुस व सोयाबीन पिकातील एकात्मिक किड व रोग व्यवस्थापना बाबत माहिती दिली. प्रा. विजय थोरे यांनी किटक नाशके फवारताना काय काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. राजेश मुळे यांनी शेतीपुरक जोडधंद्याबाबत उपस्थित शेतकऱ्यांना प्रोत्साहीत केले. प्रा. अमोल लाड यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रम यशस्वितेसाठी कृषि महाविद्यालय पाथरी च्या अंतिम वर्षाच्या सर्व कृषिदुत, कृषिकन्या व गावातील युवकांनी परिश्रम घेतले.

# ऊसतोड मजूराचा मुलगा झाला पीएसआय

## देवळाली ग्रामस्थांनी केला भव्य नागरी सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**



परिस्थिती संघर्ष करायला शिकवते कष्टाची भाकरी नवनवीन अनुभव देते अशाच ऊसतोड आई बापाच्या कष्टाचा चीज करीत मुलाने पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली आहे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सरळ सेवा भरती परीक्षेत पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झालेल्या आष्टी तालुक्यातील देवळाली खरकटवाडी येथील परमेश्वर महादेव तांदळे या युवकाची देवळाली व खरकटवाडी ग्रामस्थांनी ढोल ताशाच्या गजरात भव्य दिव्य मिरवणूक काढली आणि त्याचा भव्य असा नागरी सत्कार केला उपस्थित मान्यवरांनी परमेश्वर वर शुभेच्छांचा वर्षाव करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.माझी जन्मभूमी देवळाली आणि खरकटवाडी येथील ग्रामस्थांनी जो माझा भव्य दिव्य सत्कार केला त्या बद्दल मी तुम्हां सर्वांचा आभारी आहे असे प्रतिपादन करून परमेश्वर ने उपस्थितांचे आभार मानले यावेळी देवळाली खरकटवाडी व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते

### ७८ वर्षीय आजीचा वाढदिवसानिमित्त

# जि.प.प्रा शाळेच्या मुख्याध्यापिका राजगुरू मॅंडम यांच्या हस्ते मिठाई शाळेत वाटप करून केला वाढदिवस साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



जि.प.प्रा.शाळा शुक्रवार पेठ येथे महिला मेळाव्याचे आयोजन औचित्य होते ते म्हणजे शुक्रवार पेठ येथील माजी केंद्रप्रमुख कै.रामचंद्र योगे यांच्या पत्नीचा ७८वा वाढदिवस.या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे श्रीम.विमालताई यांच्या नातूने श्री.दत्ता योगे यांनी आपल्या आजीचा वाढदिवस शाळेत साजरा करण्याचे ठरवले...त्या निमित्ताने परिसरातील सर्व महिला भगिनी मोठया प्रमाणात उपस्थित होत्या. प्रथम विमलताई यांना औक्षण करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्या देण्यात आल्या.सर्व महिलांची भाषणे झाली.पत्रकार श्री.संतोष थोरात यांनी उपस्थीत महिलांना अशा प्रकारे शाळेत वाढदिवस साजरे करून शाळेला मदत करावी असे आवाहन केले वाढदिवसा निमित्त सर्व विध्यार्थी पालक यांना मिष्टांन्न भोजन देण्यात आले.तसेच शाळेला २ खुर्च्या व मोठे घड्याळ भेट दिले.अशा प्रकारे श्री.योगे यांनी समाजाला एक आदर्श घालून दिला.कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम.राजगुरू मॅडम यांनी सर्व महिलांना मार्गदर्शन करून शाळेच्या अडचणी सांगितल्या व शाळेस मदत करण्याचे आव्हान केले.शाळेच्यावतीने सर्व योगे कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904